# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (लेखा शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, बी विंग, तिसरा मजला
ईमेल - lekhashakha१२३@gmail.com दुरध्वनी क्र.०२०-२६११४८०५

कॅश/मु.स.नि /कावि/ 12 /2020 दि. 03 /06/2020

## आभारपत्र

**प्रति,**

**राजपथ इन्फोकॉन प्रा.लि.**
४०३, प्राईड हाऊस, गणेशखिंड रोड,
पुणे विद्यापीठ समोर, पुणे ४११०१६.

**विषय:-** मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्राप्त झालेल्या देणगीबाबत...

COVID-१९ (कोरोना) विषाणुचा प्रादुर्भाव संपूर्ण देशभरासह महाराष्ट्रात देखील मोठया प्रमाणात झालेला आहे. या महामारीचा एकजुटीने सामना करणे, शासन, प्रशासन व सर्वसामान्य नागरिक यांचेसमोर एक आव्हान आहे. त्यावर मात करण्यासाठी राज्य सरकार काटेकोरपणे उपाययोजना करीत आहे. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक आपत्कालीन यंत्रणांच्या सक्षमीकरणासाठी व सामाजिक बांधिलकी म्हणून "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोव्हीड-१९" या खात्यामध्ये समाजातील विविध स्तरातून स्वयंस्फुर्तीने मदत प्राप्त होत आहे. सदर मदतीमुळे वैद्यकीय कर्मचारी व कोव्हीड योध्दे यांचेकरीता मोठ्या प्रमाणात उपाययोजना करणेत येत आहेत. त्यामुळे कोव्हीड योध्दयांची कामाप्रती नैतिकता व मनोबल मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास मदत झाली आहे.

त्याकरीता आपणाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी या कार्यालयाकडे र.रु. १६,१२,४००/- चा धनादेश क्र. ९६४५२८ प्राप्त झाला असून सदर धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधी खात्यात जमा करणेत आलेला आहे. तरी आपण कोव्हीड-१९ या महामारीवर मात करण्यासाठी सामाजिक बांधिलकी उपक्रमात सहभाग घेऊन दिलेले लाख मोलाचे योगदान प्रशंसनीय आहे. त्याबद्दल जिल्हा प्रशासन आपले आभारी आहे.

Naval Kishore
(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी पुणे